# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# पुणे वृत्तांत

# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 27.12.2025** **वार- शनिवार**

---

**कृषी**

ग्रामोन्नती मंडळ कृषी विज्ञान केंद्राच्या वतीनं ग्लोबल कृषी महोत्सव येत्या 8 ते 11 जानेवारीदरम्यान नारायणगाव इथं आयोजित केला जाणार आहे. या प्रदर्शनात हवामान आधारित भाजीपाला व्यवस्थापन, ऊस आणि केळी पिकातील कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित शेती आणि नैसर्गिक शेती, देशी गोवंश यावर चर्चासत्र, शेळीपालन, प्रक्रिया उद्योग, कांदा-टोमॅटो मूल्यवर्धन आणि उत्पादन ते विक्री या साखळीवर विशेष परिसंवाद होणार आहे. उच्च-तंत्र शेती तंत्रज्ञान आणि करार-शेती यावरही सखोल मार्गदर्शन केलं जाणार आहे अशी माहिती केंद्राचे अध्यक्ष अनिल मेहेर यांनी दिली.

**खेड**

पुण्यातील खेड तालुक्यातील भोसे इथल्या समाज मंदिराचं अभ्यासिकेत रूपांतर करण्यात आलं आहे. पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी या अभ्यासिकेस भेट देऊन पाहणी केली. आणि या उपक्रमाबद्दल ग्रामपंचायत प्रशासन आणि ग्रामस्थांचं त्यांनी कौतुक केलं.

**साखर**

पुणे जिल्ह्यातील ऊस गाळप हंगामानं आता चांगलाच वेग पकडला आहे. ऊस गाळपात खासगी साखर कारखान्यांमध्ये बारामती, दौंड शुगरची आघाडी कायम आहे. मात्र, सर्वाधिक निव्वळ साखर उताऱ्यामध्ये सहकारी साखर कारखानेच पुढं आहेत. त्यामध्ये श्री सोमेश्वर, दी माळेगाव, श्री विघ्नहर, श्री छत्रपती आणि भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचा समावेश आहे. जिल्ह्यातील 13 साखर कारखान्यांकडून आजअखेर 47 लाख मेट्रिक टन पेक्षा जास्त ऊस गाळप पूर्ण झालं आहे. निव्वळ 8 पूर्णांक 52 टक्के साखर उताऱ्यानुसार 40 लाख क्विंटलपेक्षा जास्त साखरेचं उत्पादन झाल्याची माहिती साखर आयुक्तालयाच्या अहवालात देण्यात आली आहे.

**गाळे**

सातारा इथं होत असलेल्या साहित्य संमेलनाच्या ग्रंथ दालनातील 242 गाळ्यांची सोडत आज पुण्यात अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्राध्यापक मिलिंद जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत काढण्यात आली. साहित्य संमेलनाच्या मुख्य मंडपात ग्रंथ दालनातूनच प्रवेश असणार आहे.

**अर्ज**

पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी काल 2 हजार 664 उमेदवारी अर्जांची विक्री झाली. निवडणूक प्रक्रिया मुक्त आणि पारदर्शक ठेवण्यासाठी पुणे शहरात आदर्श आचारसंहिता पथकं कार्यरत असल्याची माहिती प्रशासनातर्फे देण्यात आली आहे.

**पिंचिअर्ज**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीसाठी काल 12 उमेदवारांनी अर्ज दाखल केले. कालअखेर 1 हजार 76 उमेदवारांनी अर्ज दाखल केला आहे. आठ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये उमेदवारांसाठी अर्ज उपलब्ध आहेत. सोबतच उमेदवारांना अर्जाविषयी मार्गदर्शन करण्यासाठी पथकंही तयार करण्यात आली आहेत.

दरम्यान, निवडणूक कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेले अधिकारी-कर्मचाऱ्यांचं प्रशिक्षण आज पार पडलं. संगणकीय सादरीकरणाद्वारे मतदान प्रक्रियेचं आणि प्रात्यक्षिकाद्वारे ईव्हीएम हाताळणीचं प्रशिक्षण दोन सत्रांमध्ये देण्यात आलं.

उमेदवारांना मनपाच्या विविध विभागाकडं थकबाकी नसल्याचं प्रमाणपत्र देण्यासाठी माहिती आणि तंत्रज्ञान विभागानं ऑनलाईन अर्ज तयार केला आहे.

**देशमुख**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात स्वतंत्र भारताचे पहिले माजी कृषिमंत्री भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख यांची जयंती आज साजरी करण्यात आली. यानिमित्त विद्यापीठाच्या सरस्वती सभागृहात कुलगुरू प्राध्यापक डॉक्टर सुरेश गोसावी आणि प्र - कुलगुरू प्राध्यापक डॉक्टर पराग काळकर यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. यावेळी शैक्षणिक आणि प्रशासकीय विभागांचे प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

**भीमाशंकर**

श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरातील सभामंडप आणि पायरी मार्गाच्या बांधकामासाठी ९ जानेवारीपासून पुढील तीन महिन्यांसाठी महाशिवरात्रीचा कालावधी वगळून भाविकांना दर्शनाकरिता मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय श्री क्षेत्र भिमाशंकर संस्थाननं घेतला आहे. या अनुषंगानं भाविकांनी सहकार्य करावं असं आवाहन पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केलं आहे. राज्य शासनाने १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष विकास आराखड्यास मंजुरी दिली आहे. थेट दर्शन बंद असलेल्या कालावधीत भाविकांना मंदिर परिसरात प्रवेश अथवा प्रत्यक्ष दर्शन सेवा उपलब्ध राहणार नाही.

**कार्यशाळा**

महाराष्ट्रीय कलोपासकतर्फे उद्या रविवारी सायंकाळी 4 वाजता भरत नाट्य मंदिर इथं महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 'अभिनय : हौस आणि व्यवसाय' या विषयावर मोफत कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. ज्येष्ठ रंगकर्मी प्रसाद वनारसे आणि अमित फाळके यामध्ये मार्गदर्शन करणार आहेत. त्यानंतर सायंकाळी 5 वाजता पुरुषोत्तम करंडक स्पर्धेच्या महाअंतिम फेरीचा पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे. याप्रसंगी ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

पुणे आणि परिसरात आज किमान 10 अंश तर कमाल 27 अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**